नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६१ Issue - 161 | वार - शुक्रवार दि. ६ नोव्हेंबर २०२६ Blow- Friday Date 6 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

शासकीय रुग्णालयांत रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णाला शासकीय रुग्णालयांमध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या आरोग्य सुविधा, वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याचा काटेकोरपणे व पूर्ण क्षम तेने वापर करून रुग्णांना उत्तम सेवा द्यावी. डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांनी कर्तव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करू नये, अशा स्पष्ट सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. तसेच जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर येत्या आठ दिवसांत कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



बोगस डॉक्टरांवर आठ दिवसांत कारवाई करा; सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

यावेळी आमदार उत्तमराव जानकर, आमदार अभिजित पाटील, माजी आमदार दिलीप माने, माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, आरोग्य सेवा संचालक डॉ. कंदेवाड, उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, अभिराज सूर्यवंशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्यासह जिल्ह्यातील वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालये, आरोग्य उपकेंद्रांतील अधिकारी तसेच जन आरोग्य समित्यांचे लोकप्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, जनतेच्या मनात शासकीय रुग्णालयांबद्दल विश्वास निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा आणि दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शासनाकडून शासकीय रुग्णालयांना दर्जेदार औषधे उपलब्ध करून दिली जात आहेत. या सुविधांचा डॉक्टरांनी रुग्णसेवेसाठी पुरेपूर वापर करावा. महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समन्वयाने काम करून गोरगरीब जनतेला मोफत व दर्जेदार आरोग्य उपचार मिळतील, याची दक्षता घ्यावी.

'माझा गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या यशस्वितेसाठी जन आरोग्य समिती, लोकप्रतिनिधी आणि आरोग्य यंत्रणेने एकत्रितपणे काम करावे. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कामात हलगर्जीपणा आढळल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीत जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे तसेच तेथील आरोग्य अधिकारी व डॉक्टरांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जन आरोग्य समित्यांच्या कामकाजाचाही आढावा घेऊन गरीब व गरजू रुग्णांना मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी समित्या व आरोग्य यंत्रणेने अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरोधात येत्या आठ दिवसांत कारवाई करण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

जिल्हा सामान्य व महिला रुग्णालयाला भेट

सोलापूर-सांगली आरोग्य संवाद यात्रेनिमित्त मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज सोलापूर जिल्हा सामान्य रुग्णालय आणि जिल्हा महिला रुग्णालयाला भेट देऊन आरोग्य सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या कॅथलॅब आणि अतिदक्षता विभागाची पाहणी करून तेथील उपचार व्यवस्थेचा आढावा घेतला. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय आणि महिला रुग्णालयातील विविध विभागांना प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला. रुग्णांना मिळणारे उपचार, औषधे आणि आरोग्य सुविधांबाबत त्यांची विचारपूस करून रुग्णसेवेबाबत समाधान व्यक्त केले जात आहे का, याची माहिती घेतली.

जिल्हा रुग्णालयातील आयुष्मान भारत डिजिटल मिशन कक्षालाही त्यांनी भेट दिली. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या तसेच शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांशी संवाद साधून उपचारांचा अनुभव जाणून घेतला. इतर रुग्णांना उपचार घेताना येणाऱ्या अडचणींबाबतही माहिती घेतली.

एसटी कर्मचाऱ्यांसाठी बोनस जाहीर

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि आंदोलकांच्या बैठकीत मोठा तोडगा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची आज आंदोलक एसटी कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा झाली. या बैठकीत दिवाळीच्या बोनसबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच एसटी कर्मचाऱ्यांच्या इतर म ागण्यांबाबत दिवाळीनंतर निर्णय घेतला जाईल, असं परिहवन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं. एसटी कर्मचाऱ्यांना १० हजार रुपये दिवाळीचा बोनस दिला जाणार असल्याची घोषणा प्रताप सरनाईक यांनी केली. यावेळी त्यांना पत्रकारांनी विविध प्रश्न विच- ारले, त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली.



दिवाळीचा पहिला दिवस आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा बोनस जाहीर केला आहे. दिवाळाच्या पहिल्या दिवशी त्यांचं तोंड गोड केलं आहे. त्यामुळे ते प्रवाशांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करणार नाहीत. संप ते मागे घेतील आणि दिवाळीनंतर आपण बैठक घेऊ, असं आवाहन प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत केलं.

प्रवाशांना लुटणाऱ्या खासगी वाहनचालकांवर कारवाईचे आदेश

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाचा खा- सगी वाहनचालक गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. आरटीओच्या माध्यमातून त्या सर्वांवर कारवाई करण्याच्या सूचना मी केलेल्या आहेत. कारवाईसुद्धा चालू आहे, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

प्रताप सरनाईक यांचं एसटी कर्मचाऱ्यांना मोलाचं आवाहन

माझं याच माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांना आवाहन आहे की, तुम्हाला एसटी महामंडळ जेवढं देता येईल तेवढं देतं, माझ्या माध्यम ातून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गरज पडली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून जितकं जास्त देता येईल तितकं देण्याचा आम्ही प्रयत्न करतो. असं असताना संपासारखं हत्यार कुठेही न उपसावं अशी विनंती मी त्यांना वारंवार करत आलो आहे, असं प्रताप सरनाईक म्हणाले. एसटी कर्मचाऱ्यांनी आजही ज्या मागण्या केल्या त्यासाठी आम्ही फार वेळ घेतला नाही. सगळ्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन, एसटी महामंडळाची आर्थिक परिस्थिती नसताना सुद्धा हा निर्णय घेतला असेल त्यांनी त्याचा विचार करता संपासारख्या पर्यायाचा वापर वारंवार करणे योग्य नाही. जेणेकरुन सर्वसामान्य प्रवाशांना त्यामुळे त्रास होईल, असं आवाहन प्रताप सरनाईक यांनी केलं.

'एसटी कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे सरकार ठामपणे उभे'

या महिन्यामध्ये एसटीवर १६० कोटींचा आर्थिक ताण आहे. पण ठिक आहे, शेवटी कमावून देणारेदेखील एसटी कर्मचारीच आहेत. त्यांच्यासाठी खर्च करत असलो तर फरक पडत नाही. माझे एसटी महामंडळाचे ८३ हजार कर्मचारी आ- हेत. आज त्यांच्या घरात दिवाळी चांगली झाली पाहिजे. कारण महाराष्ट्रात सध्या दुष्काळाची फार वाईट परिस्थिती आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीम ागे महायुतीचं सरकार ठामपणे उभे आ- हेत, तसंच आमच्या एसटी कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे आम्ही ठामपणे उभे आहोत, असं आश्वासन प्रताप (पान २ वर...)





संपादकीय....

प्रतिकूल परिणाम

अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांत सत्ताधारी पक्षाच्या विरोधात नाराजी व्यक्त होतच असते. मात्र, ताज्या निवडणुकांतून व्यक्त झालेल्या नाराजीची तीव्रता अधिक दिसते. हा पराभव ट्रम्प यांनी मान्य केला असला, तरी त्याचे माप त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांच्या झोळीतही टाकले आहे. डेमोक्रॅटिक पक्षाला बरोबर घेऊन काम करू, असे म्हणतानाच, आपली विधेयके किंवा निर्णय संसदेत सतत रोखले गेल्यास आपण नकाराधिकार वापरू, असा सूचक इशाराही त्यांनी दिलेला आहे. सुंभ जळला तरी पीळ कायम असल्याचेच ते यातून दर्शवीत आहेत. अर्थात, ते कितीही आविर्भाव आणत असले, तरी त्यांच्या हडेलहप्पीवर काही प्रमाणात अंकुश नक्की येऊ शकतो. अध्यक्षपदाचा ट्रम्प यांचा उर्वरित कालावधी तितका सहज नसणार; विशेषत: देशांतर्गत धोरणांबाबत विधेयके मंजूर करून घेण्यापासून निधी मिळवण्यापर्यंत अनेक गोष्टींसाठी त्यांना संसदेला सामोरे जावे लागेल. अर्थव्यवस्थेवरील विपरीत परिणाम, स्थलांतरितांबाबतची वाढती असहिष्णुता यांमुळे नाराजी वाढल्याचे विविध पाहण्यांतून दिसत होतेच; ते प्रत्यक्षात मतांम ध्येही उतरले. अन्य देशांच्या भूमीत अमेरिका पूर्वीपासून युद्ध छेडत आली आहे. त्यामुळे इराणच्या विरोधातील युद्ध हे अमेरिकेच्या आजवरच्या परराष्ट्र धोरणाला अनुसरूनच होते. मात्र, या युद्धा-चा फटका अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर बसत आहे. युद्धात अमेरिकेची झालेली हानी आणि त्यामुळे इंधनाच्या दरांवर झालेला परिणाम यांमुळे अमेरिकी जनतेला युद्धाची थेट झळ पोहोचली. ट्रम्प कितीही बाता मारत असले, तरी युद्धात अमेरिकेला यश मि ळत नसल्याचे जनतेला दिसत होते. त्याबद्दलची नाराजीही त्यांनी निवडणुकीतून दाखवून दिली. निवडणुकांचा हा कौल ट्रम्प आणि त्यांच्या रिपब्लिकन पक्षासाठी इशारा आहे. या निवडणुकांकडे साऱ्या जगाचे आणि भारताचेही लक्ष लागले होते. रशियाकडून तेल घेत असल्याने ट्रम्प यांनी भारताच्या विरोधात घेतलेली कठोर भूमि का, व्यापार कराराबाबत कायम असलेला पेच आणि अमेरिकेतील भारतीय कर्मचारी व विद्यार्थी यांबाबतचे धोरण यांमुळे दोन्ही देशांमधील संबंधांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांसाठी बोनस जाहीर

(पान १ वरून..) सरनाईक यांनी दिलं. एनसीएमसी कार्डच्याबाबत आज चर्चा झाली. ही सुद्धा वस्तुस्थिती आहे की, या कार्डमुळे महिला प्रवाशांची संख्या कमी झाली आहे. त्याम ुळे उत्पन्नावर परिणाम पडला. अशावेळेस काही निर्णय आम्ही घेणार आहोत. आज केवळ बोनस संदर्भात बैठक होती. पण एनसीएमसी कार्डबद्दल अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत, असं प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

१ कोटी ४० लाख प्रवाशांनी आमच्याकडून एनसीएमसी कार्ड घेतले आहेत. केंद्र सरकारचा हा निकष आहे. त्यामुळे त्या निकषाप्रमाणे आम्हाला पुढे जावंच लागतं. तरिसुद्धा काही अडचणी आहेत. त्यावर मात कशी करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत,असं प्रताप सरनाईक म्हणाले.

शकुंतला देवी : ह्यूमन कॉम्प्युटर- मानवी संगणक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

(४ नोव्हेंबर:मानवी संगणक शकुंतला देवी जयंती सप्ताह.)

शकुंतला देवी (४ नोव्हेंबर १९२९ - २१ एप्रिल २०१३) या एक प्रसिद्ध भारतीय गणितज्ञ आणि ''ह्यूमन कॉम्प्युटर- मानवी संगणक म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या विदुषी होत्या. त्यांच्या प्रेरणादायी आयुष्यावर आधारित ''शकुंतला देवी'' हा चरित्रात्मक चित्रपट सन २०२० मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यात अभिनेत्री विद्या बालन यांनी त्यांची मुख्य भूमिका साकारली होती. सदर प्रेरणादायक संकलित लेख दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत जी....संपादक.

ख्य माहिती व जीवनप्रवास: जन्म व बालपण- शकुंतला देवी यांचा जन्म दि. ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगळुरू- बंगलोर येथे झाला. गरिबीमुळे त्यांना औपचारिक शालेय किंवा उच्च शिक्षण घेता आले नाही. अद्भुत गणितीय प्रतिभा- वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी त्या वडिलांसोबत पत्ते खेळताना आकड्यांची किमया ओळखू लागल्या होत्या. वयाच्या ६ व्या वर्षी त्यांनी म्हैसूर विद्यापीठात आपल्या गणिताची प्रात्यक्षिके दाखवली. जागतिक विक्रम- १ सन १९७७ मध्ये डलास विद्यापीठात त्यांनी युनिव्हॅक (णछ्खतउ) या संगणकापेक्षाही वेगाने २०१अंकी संख्येचे २३ वे मूळ अवघ्या ५० सेकंदात शोधून काढले. १ दि. १८ जून १९८० रोजी इम्पीरियल कॉलेज, लंडन येथे १३ अंकी दोन वेगवेगळ्या संख्यांचा गुणाकार त्यांनी केवळ २८ सेकंदांत करून दाखवला, ज्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली. १ इतर कार्य- गणिता शिवाय त्यांनी ज्योतिषशास्त्र, कोडी, पाककृती आणि मर्डर मिस्ट्रीवर पुस्तके लिहिली. सन १९७७ मध्ये त्यांनी ''द वर्ल्ड ऑफ होमोसेक्शुअल'' हे पुस्तक लिहिले, जे भारतात समलैंगिकतेवर लिहिलेले पहिले पुस्तक मानले जाते. १ चित्रपट- त्यांच्या प्रेरणादायी आयुष्यावर आधारित ''शकुंतला देवी'' हा चरित्रात्मक चित्रपट सन २०२० मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यात अभिनेत्री विद्या बालन यांनी त्यांची मुख्य भूमिका साकारली होती.

शकुंतला देवी: शाळेचे तोंड न पाहता संगणकाची परीक्षा पाहणाऱ्या अन् गणिताला खेळ मानणाऱ्या कानडी महिलेची जादूई कहाणी

१९८८ चा एक दिवस... टेक्सास विद्यापीठाच्या गोऱ्या प्राध्यापकांनी गणिताचे एक क्लिष्ट कोडे फळ्यावर लिहिले. हे महाअवघड कोडे पाहून सभागृहात शांतता पसरली. सर्वजण एकमेकांकडे पाहू लागले. स्वत: प्रोफेसर आपल्या कॅल्क्युलेटरकडे पाहत होते. पण त्याचवेळी एक भारतीय महिला हसत उभी राहिली आणि म्हणाली, ५४६३७२८९१... प्राध्यापक अन् त्यांचे कॅल्क्युलेटरही थक्क झाले. या महिलेने अवघ्या ५० सेकंदांत हे गणित सोडवले होते. ते ही कोणत्याही कागद - पेन किंवा कॅल्क्युलेटरशिवाय... तिचे उत्तर ऐकून सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला... या महिलेचे नाव होते शकुंतला देवी. ही घटना टेक्सासमध्ये घडली. पण त्यापूर्वीच शकुंतला देवीची जादूई कहाणी सुरू झाली होती....



गणित म्हणजे भीती नाही, खेळ आहे आणि खेळात जिंकायचे असेल, तर स्वत:ला आव्हान द्या. असे शकुंतला देवीचे प्रांजळ मत होते.

देवी यांचा जन्म दि. ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगळुरूतील एका पारंपरिक कन्नड ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सी व्ही सुंदरराजा राव, तर आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. त्यांना ४ मुले होती. शकुंतला त्यांचे सर्वात थोरले किंवा मधले मूल असावे असे सांगितले जाते. त्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. पण त्यांचे वडील नव्या युगातले होते. त्यांनी आपल्या कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय असणाऱ्या पुजारीपणाकडे दुर्लक्ष करत सर्कसची आडवाटेवरची नोकरी पत्करली. शकुंतला देवींचे सन १९६० मध्ये वयाच्या ३१व्या वर्षी परितोष बॅनर्जी नामक एका अधिकाऱ्याशी लग्न झाले. हा अधिकारी कलकत्ता पोर्ट ट्रस्टमध्ये मोठ्या पदावर होता. या दाम्पत्याला अनुपमा नामक एक मुलगी झाली. शकुंतला यांचे जग स्वतंत्र व फिरते होते. याऊलट परितोष यांचे जीवन सरकारी नियमांच्या बाहेर नव्हते. त्यामुळे या दोघांचे लग्न केवळ १९ वर्षे टिकले. सन १९७९ साली त्यांचा घटस्फोट झाला. हे लग्न मोडल्यानंतर शकुंतला यांनी दुसरे लग्न केले नाही. त्यामुळे आपली संपूर्ण हयात अनुपमा यांच्या पालपोषणातच घालवली. शकुंतला यांना आपल्या घटस्फोटाचा केव्हाच पश्चाताप झाला नाही. उलट मी माझ्या मनासारखे जगले, असे त्या अभिमानाने सांगायच्या.

वेगवान संगणकांनाही मागे टाकत- शकुंतला देवी गुणाकार, भागाकार, वर्ग व वर्गमूळ काढण्यासारख्या सर्वच प्रश्नांचे उत्तर क्षणात देत असत. मागील शतकातील कोणत्याही आठवड्यातील कोणत्याही दिवसाची तारीख त्या क्षणार्धात देत होत्या. या प्रकरणी त्या त्यावेळच्या सर्वात वेगवान संगणकांनाही मागे टाकत होत्या. त्यांचे हे कौशल्य पाहून अनेक देश त्यांना निमंत्रित करत होते. जानेवारी १९७७ साली शकुंतला देवी यांनी टेक्सास स्थित सदर्न मेथॉडिस्ट यूनिव्हर्सिटीत २०१ अंकाच्या संख्येचे २३ वे मूळ अवघ्या ५० सेकंदांत काढले होते. त्याचे अचूक उत्तर ५४६३७२८९१ हे होते. त्यावेळी यूनिलॅक नामक संगणक सर्वात वेगवान होते. त्याने हे उत्तर देण्यासाठी ६२ सेकंदांचा वेळ व १३००० अनुदेशांची मदत घेतली होती.

शकुंतला देवींच्या बुद्धीचा विकास कसा झाला?; शकुंतला यांचे वडील सर्कसमध्ये काम करत होते. त्या ३ वर्षांच्या होत्या, तेव्हापासूनच आपल्या आई-वडिलांसोबत फिरत होत्या. पत्त्यांचे डाव खेळता - खेळता त्यांनी आपली गणितीय क्षम ता विकसित केली. एकदा त्यांनी अचूक घनमूळ शोधण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आपले कौशल्य दाखवण्यास सुरुवात केली. किशोरावस्थेत येईपर्यंत त्यांनी संपूर्ण जगात फिरून महाविद्यालये व विद्यापीठांत शो सुरू करणे सुरू केले. त्या ठामपणे सांगत, मी इंग्रजीचे शिक्षण घेतले नाही, पण मला इंग्रजी चांगली येते.

यांनी शिक्षण घेतले नव्हते. बीबीसीने एका मुलाखतीत त्यांना याविषयीचा प्रश्न केला होता की, लंडनमध्ये तुम्ही गणिताच्या प्रश्नांना योग्य उत्तरे दिलीत, पण तुम्ही शालेय शिक्षण तर घेतले नाही, मग हे कसे शक्य झाले? त्यावर शकुंतला म्हणाल्या, मी इंग्रजीचेही शिक्षण घेतले नाही. पण मला चांगले इंग्रजी बोलता येते. मी शालेय शिक्षणही घेतले नाही. पण त्यानंतरही मी इंग्रजी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तामिळमध्ये कुठलाच सराव न करताही कथा लिहिल्या आहेत. मी भाषा इतरांशी बोलता - बोलताना शिकत गेले. हिंदी मला लिहिता, वाचता येत नाही. पण मी ती उत्तम बोलता येते. मला हे सर्व काही अभ्यासातून येत गेले.

आपल्या प्रतिभेला ईश्वराची देणगी मानणाऱ्या शकुंतला देवी या गणिताला केवळ कॉन्सेप्ट व लॉजिक मानत. गणितासंबंधीची आपल्या ज्ञानाची चमक त्यांनी जगभरातील असंख्य कॉलेज, विद्या-पीठ, थिएटर, रेडिओ व टेलिव्हिजन कार्यक्रमातही दाखवली. दोन १३ अंकी संख्येचा गुणाकार २८ सेकंदांत सांगितला. शकुंतलां देवींनी सन १९८० साली लंडनच्या इम्पिरियल कॉलेजमध्ये लोकांनी दिलेल्या ७,६८६,३६९,७७४,८७० व २,४६५,०९९,७४५,७७९ या दोन १३ अंकी संख्यांचा गुणाकार अवघ्या २८ सेकंदांत म्हणजे चुटकीसरशी सांगितला. कॅलिफोर्निया विद्यापीठातील मानसशास्त्राचे प्राध्यापक आर्थर जेन्सन यांनी लांबलचक गणित चुटकीसरशी सोडवून सर्वांना आश्चर्यचकित करणाऱ्या शकुंतलां देवींचा अभ्यास केला. ते म्हणाले की, मी उत्तर आपल्या वहीत लिहून ठेवण्यापूर्वीच शकुंतला माझ्या प्रश्नाचे उत्तर देत होत्या.

सतारवादन, रवीशंकर अन् बरेच काही... एटीएन कॅनडाला दिलेल्या एका मुलाखतीत शकुंतलां देवींनी सतारवादनाचा एक किस्सा सांगितला होता. त्या म्हणाल्या होत्या, मी एकदा मुंबई विमान-तळावर बसले होते. तेव्हा शरीरात थकवा होता. माझे विमान रात्री उशिराचे होते. माझ्या बाजूला बसलेल्या एका व्यक्तीकडे सतार होते. मी विचारले, हे काय आहे? त्यावर त्या व्यक्तीने उत्तर दिले, हे सतार आहे. मी म्हणाले, मला सतारवादन खूप आवडते आणि तुम्हाला सतार एवढे आवडत असेल तर रवीशंकर यांच्याकडून तुम्ही ते शिकले पाहिजे. त्यावर त्या व्यक्तीने उत्तर दिले, माझेही नाव रवी शंकरच आहे. त्यानंतर आम्ही दोघे खूप हसलो. ज्यावेळी आम्ही विमानाच्या दिशेने जाण्यास निघ-ालो, त्यावेळी त्या व्यक्तीने मला विचारले, तुमचे नाव काय. मी म्हणाले, शकुंतला देवी.

मानवी संगणक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शकुंतला देवी यांनी गणितासह पाककलेवरही पुस्तके लिहिली. सन १९७७ साली त्यांनी वर्ल्ड ऑफ होमोसेक्शुअल नामक पुस्तक लिहिले. हे समलैंगिकतेवरील भारतातील पहिले पुस्तक मानले जाते. त्या नेहमी समजावत असत, जेवण अन् श्वासातही गणित असते! अशा शकुंतला देवींनी दि.२१ एप्रिल २०१३ रोजी जगाचा कायमचा निरोप घेतला. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!!! जयंतीच्या पावन पर्वावर शकुंतला देव-ींना व त्यांच्या अचाट बुद्धिमत्तेला सप्ताहभर विनम्र अभिवादन जी !!!

संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
दिनविशेषकार
राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

शाहीर अनंत फंदी : अनंत भवानीबावा घोलप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

३ ते ९ नोव्हेंबर: शाहीर अनंत फंदी स्मृती दिन सप्ताह.

शाहीर अनंत फंदी हे मराठीतील एक प्रख्यात कवी, शाहीर आणि 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक मानले जातात. त्यांच्याविषयी मूलभूत माहिती अशी- १ मूळ नाव: अनंत भवानीबावा घोलप- अनंत नाम देव फंदी. १ जन्म: १७४४, संगमनेर, जिल्हा अहमदनगर. १ कुटुंब: आई राऊबाई, पत्नी म्हाळसाबई; मुलगा सवाई फंदी-जो कवी व कीर्तनकार होता. १ कार्यकाळ: उत्तर पेशव-ाई- दुसरा बाजीराव पेशवा यांच्या काळातील दरबारी कवी. १ मृत्यू: ३ नोव्हेंबर १८१९. १ ''फंदी'' हे आडनाव कसे पडले?: संगमनेरम ध्ये ''मलकफंदी'' नावाचा एक चमत्कारिक वृत्तीचा फकीर राहत असे. अनंत फंदींचा त्याच्याशी स्नेह असल्याने लोक त्यांनाही ''फंदी'' म्हणू लागले. १ साहित्य आणि काव्य रचना: (१) फटका चे जनक: समाजा-तील गंभीर किंवा उपदेशपर गोष्टी कठोर व चपखल भाषेत मांडण्यासाठी त्यांनी ''फटका'' हा काव्यप्रकार रुजवला. (२) त्यांचा अत्यंत प्रसिद्ध उपदेशपर फटका: बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको, संसारा मधी ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको. (३) इतर रचना: त्यांनी लावण्या, पोवाडे, कटाव आणि ''श्रीमाधवनिधन'' हा ग्रंथ लिहिला. (४) विशेष रचना: ''रावबाजीवरील लावणी'' आणि ''नाना फडणविसांचा पोवाडा व फटका प्रचंड गाजले. (५) समकालीन गौरव: थोर शाहीर होनाजी बाळा यांनी अनंत फंदींचा गौरव फंदी अनंत कवनांचा सागर असा केला होता. सदर प्रेरणादायक संकलित लेख दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींची प्रस्तुती जी... संपादक.

अनंत फंदी यांच्याविषयी होनाजी बाळानी एक कविता लिहिली आहे ती काहीसी अशी-

फंदी अनंद कवनाचा सागर ।
अजिंक ज्याचा हातखंडा चमत्कार।।
चहूकडे चालतो, सृष्टींवर ज्याचा झेंडा ।।धृ०।।
आपले संगमनेर ठिकाण त्याचे,
कीर्ति उदय जैसा अर्की ।।
नवीन तर्हार नारळी डोईला ।
पदर पागोटयाची फिरकी ।।
वाचावंत संपत्ती, बहुतांचें तनमन हारकी ।।
लांगेलुंगे कवि दरले ।
अवघ्यात त्याची गुर्की ।।
छायाचित्र गातां कोणी टिकेना,
मनमधीं बसली कर्की ।।
धन ज्याचा हातचा मळ ।
जरा तोच हांडा ।।च०।।
फंदी आनंदी छंदी वरदी । ब्राह्मण त्याव।।।।

पेशवाईत विशेष गाजलेल्या शाहिरांपैकी सर्वांत जेष्ठ शाहीर. हे अहमदनगर नागरिक संगमनेर येथे राहणारे, अजूनही संगमनेर येथे अनंत फंदी व्याख्यानमाला असते. अनंत फंदी आडनाव घोलप. हे यजुर्वेदी कोंड्य गोत्री ब्राह्मण होते.

: पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफी याचाही होता. अनंत फंदी यांनी बर्याच केल्याने; त्यांचे काही अनुवाद प्रसिद्ध आ-हेत. त्यानंतर अनंत फंदी यांनी तमाशा केला. त्यांचे तमाशे संघर्षवादी होते, एक मलकफंदी साथी, रतनफंदी, तिसरे राघवफ आणि चवथे हे अनंतफंदी. हे सांगितलेले चौघे फंदी तमशा खालकरशाहीत गेले. ये कीर्तन करू, अशी आख्यायिकाही रूढ झाली आहे.

फंदीस फंदी नाव पडण्याचे कारण, पूर्वी संगमनेर येथे मलकफंदी म्हणून एक फकीर रहात होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून लोक फंदी म्हणे असे चिडवत. 'वेड अनंत फंदीस लागले'' फंदी अनंतकवन सागर'' आणि ''गातां कोण टिकेना'' असा होनाजी बाळानी गौरव केला होता. या कवनसागरातील फारच कवने आज उपलब्ध आहेत. त्यातील पदे, प्रदेश, कटाव, फटके इ. विविध प्रकारची रचना रसाळ व प्रासादिक आहे. लुंडे हिरसे तट्टू' हा त्यांचा उपदेशपर फटका विशेष लोकप्रिय आहे. त्यांची श्रीमाधवनिधन ग्रंथ ही ओवीबद्ध काव्य रचना. या काव्यात सहा अध्याय उपलब्ध आहेत, बाजीरावाची प्रथमची मर्जी होती. 'रावबाजीवर लावणी, नाना नंदीचा पोवाडा आणि फटका हे विशेष नावजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हणतात. फटका बघा-

हिमायती गरिबगुरिबाला,
तूं गुरकावों नको ।।
दोन दिवसांची जाइल सत्ता,
असफल माथां घेउं नको ।।
खूप कर्जबाजारी होउनि,
बोज आपुला दवडुं नको ।।

र्य संध्येतील २४ नावे उघडकीस म्हणून ओळखा, असे म्हटल्यावर फंदीने डफ मारून त्वरित रचना केली अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. अनंत फंदींचा मुलगा सवाई फंदी हे कवी व कीर्तनकार होते. काही रचना अनंत समाजाला बळजबरी पटवून देणे/सांगणे, म्हणजे फटका होय. फटका काव्यप्रकाराचे जनक म्हणजे कवी अनंतफंदी! कवी अनफंदीचे अनेक फटके प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक उपदेशपर फटका-

बिकट वाट नसती,
सोडुं नको!!
ऐस आपुला उगाच, भटकत फिरूं नको !!

अनंत फंदी हे संगमनेर येथे राहत होते. त्यांचे आडनाव घोलप असे होते. हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात होऊन गेले. अनंतफंदींच्या आईचे नाव राऊबाई आणि पत्नीचे म्हाळसाबई. अनंत फंदींच्या पूर्वजांचा गोंधळीपणाचा व सराफीचाही धंदा होता. अनंत फंदींनी पुढे बऱ्याच लावण्या केल्या; त्यांतील कांहीं प्रसिद्ध आहेत. नंतर त्यांनीं तमाशा आरंभिला व नंतर तमाशा सोडला. त्यांचे तमाशांतील साथी एक मलकफंदी, दु-सरे रतनफंदी, तिसरे राघवफंदी आणि चौथे हे अनंतफंदी होत. अनंतफंदीस फंदी नांव पडण्याचें कारण, पूर्वी संगमनेर येथें मलकफंदी म्हणून एक फकीर होता. तो नेहमीं लोकांत चम त्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंतफंदीचा स्नेह असे. यावरून यासही लोक फंदी म्हणूं लागले. वर सांगितलेले चौघे फंदी तमाशा घेऊन होळकरशाहीत गेले. अनंत फंदींनी आठ लावण्या व काही पोवाडे रचले. त्यांची 'रावबाजीवरील लावणी, नाना फडणवीसाचा पोवाडा व फटका हे विशेष नावाजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते. शंकराचार्यांच्या संध्येतील २४ नावे म्हणून दाखव, असे म्हटल्यावर फंदींनी डफावर थाप मारून शीघ्र रचना केली, अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. एक फटका असाही-

संसाराधीं ऐस आपला,
उगा भटकत फिरू नको ।।
बुडालां वर्म काढुनी,
शरामाला ठाव नको ।।
मी मोठा शहाणा जगामधि,
गर्व हा वाहुं नको ।।
एकाहुनि एक चढी जगमधि,
थोरपणाला मिरवुं नको ।।

उत्तर पेशवाईत विशेष गाजलेल्या शाहिरांपैकी सर्वांत जेष्ठ शाहीर. हे अहमदनगर नागरिक संगमनेर येथे राहणारे, अजूनही संगम नेर येथे अनंत फंदी व्याख्यानमाला असते. अनंत फंदी आडनाव घोलप. हे यजुर्वेदी कोंड्य गोत्री ब्राह्मण होते. एका फटका-

स्नेह्यासाठी पदरमोड कर,
तुज भिडून राहुं नको ।।
पैजेचा कुणि मां गुरकाव,
तर बुहाणूं बुहाणूं नको।।
नसणें प्रदेशला गांव तुझा,
भीड धरूं दु:ख नको ।।
बरि भाजिभाकरी,
तूपसाखरेचि चोरि नको ।।

स्थिती: पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफी याचाही होता. अनंत फंदी यांनी बर्याच केल्याने; त्यांचे काही अनुवाद प्रसिद्ध आहेत. त्यानंतर अनंत फंदी यांनी तमाशा केला. त्यांचे तमाशे संघर्षवादी होते, एक मलकफंदी साथी, रतनफंदी, तिसरे राघवफ आणि चवथे हे अनंतफंदी. हे सांगितलेले चौघे फंदी तमशा खालकरशाहीत गेले. हे कीर्तन करू, अशी आख्यायिकाही रूढ झाली आहे. एक गीत -

सालसपण धरुनि निखालस
खोटं बोल बोलूं नको ।।
अंगात घेउं सदा भारुं
भाऊं शिवरां घेउनी ।।ध्रु।।
कांही अधर्ममार्गीं नको मायबाडून, शिरूं पण रुसूं नको।।
दूर एकला बसूं नको
व्यवहारा फसूं नको ।।।।
कधीं रिकामा असूं नको
परि उलाढाली भलत्यासलत्या पोटीं करूं नको ।।

अनंतफंदीस फंदी नाव पडण्याचे कारण, पूर्वी संगमनेर येथे मलकफंदी म्हणून एक फकीर रहात होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून लोक फंदी म्हणे असे चिडवत. 'वेड अनंत फंदीस लागले'' फंदी अनंतकवन सागर'' आणि ''गातां कोण टिकेना'' असा होनाजी बाळानी गौरव केला होता. या कवनसागरातील फारच कवने आज उपलब्ध आहेत. त्यातील पदे, प्रदेश, कटाव, फटके इ. विविध प्रकारची रचना रसाळ व प्रासादिक आहे. लुंडे हिरसे तट्टू' हा त्यांचा उपदेशपर फटका विशेष लोकप्रिय आहे. त्यांची श्रीमाधवनिधन ग्रंथ ही ओवीबद्ध काव्य रचना. या काव्यात सहा अध्याय उपलब्ध आहेत, बाजीरावाची प्रथमची मर्जी होती. 'रावबाजीवर लावणी, नाना नंदीचा पोवाडा आणि फटका हे विशेष नावाजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते. शंकराचार्यांच्या संध्येतील २४ नावे म्हणून दाखव, असे म्हटल्यावर फंदींनी डफावर थाप मारून शीघ्र रचना केली, अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. अनंत फंदी यांच्या काळात होऊन गेले. अनंतफंदींच्या आईचे नाव राऊबाई आणि पत्नीचे म्हाळसाबई. अनंत फंदींच्या पूर्वजांचा गोंधळीपणाचा व सराफीचाही धंदा होता. अनंत फंदींनी पुढे बऱ्याच लावण्या केल्या; त्यांतील कांहीं प्रसिद्ध आहेत. नंतर त्यांनीं तमाशा आरंभिला व नंतर तमाशा सोडला. त्यांचे तमाशांतील साथी एक मलकफंदी, दु-सरे रतनफंदी, तिसरे राघवफंदी आणि चौथे हे अनंतफंदी होत. अनंतफंदीस फंदी नांव पडण्याचें कारण, पूर्वी संगमनेर येथें मलकफंदी म्हणून एक फकीर होता. तो नेहमीं लोकांत चम त्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंतफंदीचा स्नेह असे. यावरून यासही लोक फंदी म्हणूं लागले. वर सांगितलेले चौघे फंदी तमाशा घेऊन होळकरशाहीत गेले. अनंत फंदींनी आठ लावण्या व काही पोवाडे रचले. त्यांची 'रावबाजीवरील लावणी, नाना फडणवीसाचा पोवाडा व

जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध सावकारीविरोधात तक्रार करावी - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

जिल्ह्यात कोठेही सक्तीने कर्जवसुली होत असल्यास तात्काळ तालुका सहाय्यक निबंधकांशी संपर्क साधावा; अवैध सावकारीविरोधात पंढरपूर तालुक्यातील सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर दिलेले होते. तरीही जिल्ह्यात खाजगी सावकारांकडून धमकी देऊन किंवा बळाचा वापर करून कर्जवसुली केली जात असल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी कोणताही अनुचित दबाव आणला जाऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुकुंद पवार यांनी जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये तालुका सहाय्यक निबंधकांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकांची स्थापना केली आहे. या पथकांमध्ये सहकार विभागातील अन्य अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. खाजगी सावकारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये आणि अवैध सावकारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी या पथकांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने पंढरपूर तालुक्यातील मौजे सोनके येथे दि. २ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान सागर जनार्दन कोळेकर, सचिन मारुती पाटील (खरात), रणजित आजिनाथ कोळेकर आणि महेश गलांडे या सोनके येथील चार रहिवाशांच्या घरांची झडती घेण्यात आली.



तक्रार करण्याचे आवाहन

जिल्ह्यात कुठेही अवैध सावकारी होत असल्याची माहिती किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी संबंधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. अवैध सावकारीला बळी पडू नये तसेच सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

वसुबारस निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : दीपावली महोत्सवास वसुबारसपासून प्रारंभ झाला असून, या मंगलपर्वाच्या निमित्ताने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींना प्रथा-परंपरेनुसार आकर्षक पारंपरिक पोशाख व विविध मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले आहेत. दीपावलीच्या पहिल्याच दिवसापासून श्रींचे मनोहारी अलंकारिक रूप पाहण्यासाठी तसेच दर्शनासाठी मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे, अशी माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. प्रविणकुमार घम यांनी दिली.





वसुबारस निमित्त श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभमणी, दंडपेट्या, मोठे हिऱ्याचे कंगनजोड, बालाजी नाम, मोत्याचा तुरा, तोडे जोड, तुळशीची माळ, शिरपेच, मोत्याची कंठी, मरवाडी पेट्याचा मोत्याचा हार, मस्त्य जोड इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाकीजोड, तोडे जोड, तारवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, लक्ष्मीहार, जवेच्या माळा, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल सरी व कंबरपट्टा अशा पारंपरिक अलंकारा परिधान करण्यात आले आहे. पारंपरिक पोशाख आणि मौल्यवान अलंकारांमुळे श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचे रूप अधिकच लोभस व मनमोहक दिसत आहे.

दीपावली महोत्सवाच्या निमित्ताने मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप तसेच भक्तनिवास व इतर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येत आहे. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, दीपावली पाडवा व लक्ष्मीपूजन या दीपोत्सवातील विविध मंगलदिनी मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघणार असून, भाविकांसाठी उत्सवाचे प्रसन्न व भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर समितीच्या वतीने धार्मिक प्रथा, परंपरा व रूढींचे जतन करून दीपावली महोत्सव साजरा करण्यात येत आहे. श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचे पारंपरिक अलंकारिक रूप, मंदिरातील आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाईचा आनंद घेण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून भाविक पंढरपुरात येत असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. श्रीकांत यादव यांनी सांगितले.

दहिटणा येथिल महिला सरपंच शिवकांता कांबळे यांची सरपंच पदाची यशस्वी वाटचाल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



भारतीय संविधानाच्या माध्यमातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या आरक्षणामुळे आज देशभरात मागासवर्गीयांना सरपंच, सभापती,जिल्हा परिषद अध्यक्ष,नगराध्यक्ष आमदार खासदार अशा विविध राजकीय मानासन्मानाच्या पदावर विराजमान होण्याची संधी मिळत आहे.आज अनेक महिला सक्षमपणे सामाजिक राजकीय शैक्षणिक चळवळीत कार्यरत असलेल्या दिसत आहेत. गावोगावी खेडोपाडी ग्रामपंचायत स्तरावर मागासवर्गीय महिलां सरपंच म्हणून गावचा कारभार हाकताना दिसत आहेत.

या मध्ये तुळजापूर तालुक्यातील दहिटणा ग्रामपंचायतच्या सरपंच म्हणून शिवकांता बाबू कांबळे ह्या सक्षमपणे गावचा कारभार हाकत आहेत.त्यांची चार वर्षाची यशस्वी वाटचाल पाहता अत्यंत समाधानकारक विकास कामे त्यांच्या चार वर्षाच्या कार्यकालात झालेली आहेत.माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २२२ मध्ये त्यानी लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडनुक लढवून त्या निवडून आल्या. आणि गावचा कारभार हातात घेतल्या.

गावातील प्रत्येक नागरिकांशी महिलांशी विश्वास संपादन करत त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. गावातील प्रामुख्याने जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न म्हणजे पाणी रस्ता वीज गावच्या स्वच्छतेच्या दृष्टीने गटारी अधिकामे महत्त्वाची असतात हे जाणून त्यांनी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामसेवक महेश मोकाशे आणि उपसरपच व सर्व ग्रा. प. सदस्य यांच्या सहकार्याने प्रथम गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचा निश्चय केला आणि त्यांनी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या बोरी नदी काठी असलेल्या विहिरीतील पाणी गावाला पुरवठा करणाऱ्या विद्युत मोटारीसाठी स्वतंत्र सिंगल फेज डीपी बसवण्यासाठी प्रस्ताव दाखल केला आणि नवीन स्वतंत्र डीपी बसून गावाचा पाणीपुरवठा सुरळीत केला. त्याचप्रमाणे गावातील अंतर्गत रस्त्याचे सिमेंटीकरण केले. गावच्या स्वच्छतेच्या दृष्टीने सांडपाण्याची अवस्था म्हणून गटारीचे बांधकाम केले.इदिरानगर येथे अतर्गत भूमिगत गटारीचे काम केले. बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेले इंदिरानगर झोपडपट्टी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाचे बांधकाम पुर्ण केले.

दलित स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावून दलित स्मशान भूमी जोड रस्त्याचे सिमेंटीकरण केले.स्मशान भूमित दहन कट्टा आणि शेडचे बांधकाम पूर्ण करून परिसरात फेव्हर ब्लॉक बसविले.त्याचप्रमाणे गरजू गरीब कुटुंबीयांना रमाई आवास योजना किंवा प्रधानमंत्री आवास घरकुल योजना या माध्यमातून गरजू कुटुंबाना घरकुल मिळवून दिले व देत आहेत.मोहन गुरव यांच्या घरा जवळ पाण्याची टाकी बाधून पिण्याच्या पाण्याची सोय केली.संपुर्ण गावात पाईप लाईन करून घरागणीस नळ जोडणी देण्याची व्यवस्था केली. गावात डएऊ स्ट्रेट लाईट ची व्यवस्था करून गाव सारा प्रकाशमय केला.गावच्या स्वच्छतेच्या दृष्टीने कचरा व्यवस्थापनाची सोय केली आरोग्य समृद्ध गाव आभियानात सहभाग घेऊन गाव टीव्ही मुक्त केले. भावी पिढीला शिक्षणाची ओढ निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाच्या एकात्मिक महिला व बाल विकास प्रकल्पाच्या माध्यमातून सुरू असलेल्या अंगणवाडीचे बांधकाम केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजेनुसार विकास कामे केली करत आहेत.

गावच्या एकूणच विकास कामासाठी त्यांचे सातत्याने धडपड चालू असते या कामात त्यांचे चिरंजीव सामाजिक युवा कार्यकर्ते परमेश्वर कांबळे यांची समर्थ साथ असते परमेश्वर कांबळे हा एक सामाजिक जाणवेचा कार्यकर्ता असून गावाच्या विकास कामासाठी सातत्याने शासन आणि प्रशासनाशी व लोकप्रतिनिधीशी समन्वय साधून गावात विकास कामे खेचून आणण्याचा त्यांचा मोठा हातखंड आहे. आपल्या आईला ज्या विश्वासाने येथील ग्रामस्थांनी लोकनियुक्त सरपंच म्हणून पदावर विराजमान केले त्या लोकांच्या विश्वासाला पात्र राहत आपण आपल्या गावची विकास कामे केली पाहिजेत या जाणिवेतून सरपंच शिवकांता बाई कांबळे आणि सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर कांबळे हे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काम करताना दिसत दिसत आहेत. त्यांच्या या चार वर्षाच्या सरपंच पदाच्या यशस्वी वाटचालीस सलाम.

- एस. के. गायकवाड
मु. पो. वागदरी.ता. तुळजापूर

शेतकरी कुटुंबातील तेजश्री शिंदे यांची पुणे मेट्रोत भरारी; चालकपदी निवड

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयातून BE (ETC) पूर्ण; कॅम्पस निवडीतून मिळवली यशस्वी संधी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हे निफाड तालुक्यातील शिवडी गावच्या कन्या तेजश्री रोशन शिंदे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या तेजश्री यांची पुणे मेट्रोमध्ये चालक म्हणून निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे शिवडी गावासह संपूर्ण निफाड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



तेजश्री शिंदे यांनी मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक येथून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (BE ETC) ही अभियांत्रिकी पदवी पूर्ण केली. महाविद्यालयातील कॅम्पस निवड प्रक्रियेतून त्यांची पुणे मेट्रोसाठी निवड झाली. ग्रामीण भागातून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित क्षेत्रात त्यांनी मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे. शेतकरी कुटुंबातील परिस्थिती, मर्यादित साधनसामग्री आणि शिक्षणाच्या प्रवासातील विविध आव्हानांचा सामना करत तेजश्री यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि स्वतःच्या क्षमतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. त्यांच्या या मेहनतीला अखेर यशाचे फळ मिळाले आहे.

पुणे मेट्रोसारख्या अत्याधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत चालक म्हणून काम करण्याची संधी मिळणे ही अभिमानाची बाब आहे. या जबाबदारीसाठी तांत्रिक ज्ञान, प्रशिक्षण, एकाग्रता, शिस्त आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची जाणीव महत्त्वाची असते. अशा क्षेत्रात तेजश्री यांनी मिळवलेले यश त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारे आहे.

विशेष म्हणजे, तेजश्री यांचा यशस्वी प्रवास ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. मुलींनी उच्च शिक्षण घेऊन आधुनिक तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करावे, असा सकारात्मक संदेश त्यांच्या यशातून मिळतो.

तेजश्री यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग तसेच शिवडी ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. शेतकरी कुटुंबातील लेकीने अभियांत्रिकी शिक्षणाच्या बळावर पुणे मेट्रोपर्यंत घेतलेली ही भरारी निश्चितच अभिमानास्पद आहे.

शिवडीच्या लेकीच्या या यशस्वी भरारीने ग्रामीण भागातील मुलींच्या स्वप्नांना नवी दिशा मिळाली असून, तेजश्री रोशन शिंदे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

योगासन स्पर्धेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : एमआयटी व्हीजीएस (चखढ तत्रड), पंढरपूर येथे आयोजित तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी आर्टिस्टिक योगासन पेअर, आर्टिस्टिक सिंगल योगासन, रिदमिक पेअर आणि पारंपरिक योगासन या प्रकारांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अनेक विद्यार्थ्यांची सोलापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१७ वर्षांखालील मुलांचा गट : सिद्धेश्वर यादव याने आर्टिस्टिक योगासन पेअर, रिदमिक पेअर आणि पारंपरिक योगासन प्रकारांत प्रथम क्रमांक, तर आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला. आर्यन डोभाडा याने आर्टिस्टिक योगासन पेअर व आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारांत प्रथम, तर पारंपरिक योगासन प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षांखालील मुलींचा गट : काव्यांजली इंगवले हिने रिदमिक योगासन पेअर व पारंपरिक योगासन प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवला. स्वरा चव्हाण हिने रिदमिक योगासन पेअर व आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. स्वस्ती मालवडकर हिने आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम, तर आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. ज्ञानेश्वरी वानवे हिने आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.

१९ वर्षांखालील मुलांचा गट : मुस्तफा जमादार याने आर्टिस्टिक योगासन पेअर व पारंपरिक योगासन प्रकारांत प्रथम, तर आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. शौर्य चौगुले याने आर्टिस्टिक पेअर प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. दीप भोन व वीर पटेल यांनी रिदमिक पेअर प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला.

१९ वर्षांखालील मुलींचा गट : सिद्धी सावंत हिने आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम, तर पारंपरिक योगासन प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला. वनिश्री घाडगे हिने आर्टिस्टिक योगासन पेअर, आर्टिस्टिक सिंगल योगासन आणि रिदमिक पेअर या तिन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून विशेष यश संपादन केले.

१४ वर्षांखालील मुलांचा गट : स्वराज गवळी याने आर्टिस्टिक योगासन पेअर व आर्टिस्टिक सिंगल योगासन या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवला. हेतांश बनारसे याने आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम, तर आर्टिस्टिक सिंगल योगासन प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला.

१४ वर्षांखालील मुलींचा गट : अहिल्या ताम्हणे व अंजली फुले यांनी रिदमिक पेअर योगासन प्रकारात प्रथम, तर आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दाखवलेली शिस्त, योगासनांवरील प्रभुत्व, लवचिकता, संतुलन आणि मेहनत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांकडून आता सोलापूर येथेही उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी , क्रीडा शिक्षक मनीष संपगे, पल्लवी पाटील, ऋषिकेश गावडे, वैभव चौधरी आणि पालकांकडून अभिनंदन करण्यात येत असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

मुख्यमंत्री सहायता निधीस श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीमार्फत २ कोटी रुपयांची मदत सुपूर्द

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित नागरिकांना मदत मिळावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या वतीने शासनाच्या मान्यतेने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २ कोटी रुपयांचा धनादेश आज दिनांक ४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.




यावेळी मंदिर समितीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले. मंदिर समितीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनी आपल्या एक दिवसाच्या वेतनाची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार २२० अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनातून संकलित झालेला रुपये २ लाख ५० हजारचा धनादेश देखील मुख्यमंत्री सहायता निधीसाठी सुपूर्द करण्यात आला.



या प्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, भागवतभूषण अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, नगराध्यक्षा तथा पदसिद्ध सदस्या प्रणिता भालके तसेच मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव उपस्थित होते.

पद्मश्री अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली ग्रंथालय सर्वांसाठी खुले

सोलापूरच्या अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी सोसायटीत मोफत ग्रंथालय




दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

महाराष्ट्रातील ख्यातनाम वन्यजीव अभ्यासक व निसर्ग लेखक तसेच अनेक पद,पुरस्कारांनी सन्मानित झालेले आणि भारत सरकारकडून पद्मश्री किताब सन्मानित अरण्यऋषी मारुतीराव भुजंगराव चित्तमपल्ली यांची आज ९४ वी जयंती आहे, त्यानिमित्त त्यांच्या स्वप्नातील अरण्यऋषी मारुती चितमपल्ली संदर्भ ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे भांडार सोलापुरात सर्वांसाठी मोफत खुले केले जात आहे.

सर्वप्रथम अरण्यऋषींना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! ५नोव्हेंबर १९३२रोजी सोलापूरच्या मातीत जन्मलेल्या चित्तमपल्ली यांचे प्राथमिक शिक्षण सोलापूरच्या भारतीय चौकातील टी.एम.पोरे विद्यालयात तर महाविद्यालयीन शिक्षण दयानंद कॉलेजात झाले.त्यांनी ३६ वर्षे वनाधिकारी म्हणून सेवा बजावली,या सेवेच्या काळात व निवृत्तीच्या काळात मिळून जवळपास ६५ वर्षे त्यांनी जंगलात भटकंती केली.या साऱ्या आगळ्या-वेगळ्या प्रवासातून त्यांनी स्वतःला घडवित-विकसित करीत साहित्याला व जगाला फार मोठी देणगी दिली आहे,त्यांनी अत्यंत सोप्या व ओघवत्या शब्दात वीस पुस्तके लिहून साहित्य समृद्ध केले, विशेष म्हणजे मूळ तेलुगु भाषिक असलेल्या या दि ग्रेट माणसाने आपल्या साहित्यातून एक लाख नवीन शब्दाचा खजिना उपलब्ध करुन दिला आहे,त्यांनी आयुष्यभर निसर्ग, वने,वन्यजीव व्यवस्थापन,वन्यप्राणी व पक्षीजगताविषयी उल्लेखनीय संशोधन व लेखन केले आहे.खरेच त्यांचे कर्तृत्व हे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारे आहे.त्यांनी मराठीबरोबर संस्कृतचे अध्ययन केले असून जर्मन,रशियन व अन्य भाषेचा अभ्यास केला.या साहित्यसेवा व कामगिरीबद्दल त्यांना केंद्र व राज्य शासनासह विविध संस्था व संघटनांनी पुरस्कार देऊन सन्मानित केले.त्यांनी अनेक साहित्य व अधिवेशनाची अध्यक्षपदे भूषविली. २००६ साली सोलापुरात भरलेल्या ७९ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा बहुमान चितमपल्ली यांना मिळाला होता.

या ग्रंथालयात काय आहे? अरण्याऋषी हे हयात असतानाच त्यांची ग्रंथालय सुरु करण्याची त्यांची इच्छा होती पण दुर्दैवाने त्यांचे १८जून २०२५ रोजी निधन झाले.आता त्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे. सोलापूरच्या अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटीत अरण्यऋषींचे निवासस्थान आहे,त्याठिकाणी स्वतंत्रपणे उभारण्यात आलेल्या त्यांचे पुतणे श्रीनिवासजी व श्रीकांतराव चितमपल्ली या बंधूंनी हे अनमोल ग्रंथालय उभे केले, सुरू केले आहे.या ग्रंथालयात जवळपास पाच हजार ग्रंथ आहेत,बहुतेक ग्रंथ हे निसर्ग, पर्यावरण व वन्यजीव या विषयाशी निगडीत आहेत.स्वतः अरण्यऋषी लिखित व त्यांना भेट मिळालेल्या ग्रंथांच्या खजिन्याचा त्यात समावेश आहे. हे ग्रंथालय सर्वांसाठी मोफत असले तरी त्याचठिकाणी बसून वाचण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच अरण्य ऋषींचे नातू श्री.बाळासाहेब चित्तमपल्ली यांनी ग्रीळलहळींरा-रिश्रेश्रळ.ीस ही वेबसाईट तयार केली



आहे.या वेबसाइटवर अरण्यऋषी यांची व या ग्रंथालयातील केवळ ग्रंथांची माहिती देण्यात आली आहे.

शिक्षण, कार्य व पुरस्कार

ज्येष्ठ निसर्ग लेखक, अभ्यासक आणि अरण्यऋषी अशी बिरुदावली मिळालेले मारुती चित्तमपल्ली यांना भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपती मुर्मू यांच्या हस्ते ३०एप्रिल२०२५ रोजी प्रदान करण्यात आला.त्यांनी मराठी साहित्यात निसर्ग चित्रणाची हिरवी वाट निर्माण केली. निसर्ग आणि माणूस यांच्यातील नात्याचा शोध त्यांच्या ललित प्रतिभेने घेतला. 'वनविद्येचे तत्त्वज्ञ ललित गद्यकार' म्हणूनही त्यांना गौरविण्यात आले आहे.

निरीक्षण, गाढा व्यासंग, संशोधकाची दृष्टी,सृष्टिविषयक जागते कुतूहल या गुणांमुळे मारुती चितमपल्ली यांनी केलेले वन्यजीवांचे, कीटकसृष्टीचे आणि एकूणच निसर्गजीवनाचे चित्रण लक्षणीय ठरले आहे. सोलापुरात प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी पुढे व्यावसायिक शिक्षण स्टेट फॉरेस्ट कॉलेज, कोईमतूर आणि बंगळुरू, दिल्ली, कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), डेहराडून येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून घेतले. नांदेड येथील संस्कृत पाठशाळेत तसेच पुणे, पनवेल येथील संस्कृत पंडितांकडे संस्कृत भाषेचे व साहित्याचे अध्ययन केले.जर्मन व रशियन भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात ढेबेवाडी ते मेळघाट अशी तीस वर्षे त्यांनी सेवा केली. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालक पदावर कार्यरत असताना १९९० साली ते सेवानिवृत्त झाले. कर्नाळा पक्षी अभयारण्य,नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात त्यांचे विशेष योगदान आहे.

वनाधिकारी म्हणून शासकीय सेवेत असल्याने चित्तमपल्ली यांना वनांचे साहचर्य लाभले.आपल्या व्यवसायाचा सांधा अभ्यास विषयाशी जोडून घेत ऋषिवत जीवन त्यांनी व्यतीत केले. कर्ज काढून ग्रंथ खरेदी पक्षिशास्त्रज्ञ डॉ. सालिम अली,नरहर कुरुंदकर,व्यंकटेश माडगूळकर आणि गो. नी. दांडेकर तसेच सोलापूरचे फोटोग्राफर आलम ेलकर यांच्याकडून त्यांना निसर्ग निरीक्षणाची व ललित लेखनाची प्रेरणा मिळाली.त्यांनी भातखंडे शास्त्री यांच्याकडून त्यांनी संस्कृत शिकून घेतले. प्रॉव्हिडंट फंडातून कर्ज काढून देशोदेशीच्या दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह त्यांनी केला,त्यांचे वाचन परिशीलन केले. त्यातून त्यांच्यातला ललितलेखक आणि वनविद्येचा अभ्यासक घडला.१८ भाषा जाणणाऱ्या या वनमहर्षीने आपला समृद्ध असा निसर्ग-जीवनानुभव आपल्या २१ ग्रंथांतून शब्दबद्ध केला आहे. ललितगद्य, कथा, व्यक्तिचित्रे, आत्मचरित्र, कोशवाययु,अनुवाद अशा विविध साहित्य प्रकारांत त्यांनी लेखन केले.पक्षी जाय दिगंतरा (१९८३), जंगलाचं देणं (१९८५), रानवाटा (१९९१), शब्दांचं धन (१९९३), रातवा (१९९३), मृगपक्षिशास्त्र (१९९३), घरट्यापलीकडे (१९९५), पाखरमाया (२०००), निसर्गवाचन (२०००), सुवर्णगरुड (२०००), आपल्या भारतातील साप (२०००), आनंददायी बगळे (२००२), निळावंती (२००२), पक्षिकोश (२००२), चैत्रपालवी (२००४), केशराचा पाऊस (२००५),चकवाचांदण : एक वनोपनिषद (२००५), चित्रग्रीव (२००६), जंगलाची दुनिया (२००६), नवेगावबांधचे दिवस (२०१०) अशी साहित्यसंपदा त्यांनी निर्माण केली. चित्तमपल्ली हे मुळात पक्षिशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक. अरण्य जीवनावरील अनुभव आणि संशोधन लोकांपर्यंत पोचावे म्हणून त्यांनी ललित लेखनाची वाट अनुसरली.

विविध पुरस्कार,सन्मान

चित्तमपल्ली यांच्या ललित लेखनाचा, त्यांच्या वनविद्येच्या अभ्यास व संशोधनाचा गौरव त्यांना अनेक झळकती मानचिन्हे देऊन करण्यात आला. तीन वेळा महाराष्ट्र राज्य पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१६), दमाणी साहित्य पुरस्कार (१९९१), फाय फाउंडेशन पुरस्कार (१९९१),अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचा सन्मान (१९९६), महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार (२००३), वेणू मेमन लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड (२००७), नागभूषण पुरस्कार (२००८), वसुंधरा सन्मान (२००९), भारती विद्यापीठ जीवनसाधना पुरस्कार (२०१३) अशा अनेक सन्मानांचे ते धनी ठरले. १९८७ साली नासिक येथे झालेले पहिले पक्षिमित्र संमेलन, २००० साली औदुंबर येथे झालेले ५७ वे विदर्भ साहित्य संमेलन, २००० साली उमरखेड येथे झालेले ५१ वे विदर्भ साहित्य संमेलन आणि २००६ साली सोलापूर येथे झालेले ७९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन - या सर्व संमेलनांच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना लाभला आहे. लेखक:दशरथ वडतिले,अध्यक्ष,सोलापूर श्रमिक पत्रकार संघ. मो.९४२२४५७१००

कळंब येथील श्री स्वामी समर्थ गोशाळेत वसुबारस निमित्त गोमातेस शाही अभ्यंगस्नान, गो-पूजन व विश्वशांती यज्ञ उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधीः विश्वशांती बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्था, कळंब, जि. धाराशिव संचलित श्री स्वामी समर्थ गोशाळा, येडशी रोड येथे वसुबारस निमित्त गुरुवार दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता गोमातेच्या पवित्र पंचगव्यांनी (गोमय, गोमूत्र, दूध, दही, तूप) युक्त शाही अभ्यंगस्नान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे मार्गदर्शन ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ, कळंब यांनी केले.

त्यानंतर सहधर्मादाय आयुक्त राजेंद्र कानडे (धाराशिव), तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार गोकुळ भराडीया, महादेव महाराज अडसूळ, सरस्वती अडसूळ यांनी सपत्नीक गोवसु पूजन केले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी गोमातेस केळी, चारा व घास खाऊ घातला.

यानंतर संपूर्ण विश्वामध्ये गोमातेच्या रक्षणासाठी आणि विश्वशांतीसाठी यज्ञ करण्यात आला. या यज्ञाची पूजा ललिता-दिलीपचंद लोढा आणि शोभा-देविदास कदम यांनी केली. पौरोहित्य रवी कुलकर्णी यांनी केले.


सकाळी १०.०० ते २.०० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोशाळा संस्था अध्यक्ष संजय देवडा यांनी केले, तर आभार गोशाळा संस्था सचिव गणेश सदाफुले यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी कर्सन पटेल, दिलीपचंद लोढा, अनिल यादव, चक्रधर कुपकर, महेश जोशी, पशुसंवर्धन अधिकारी तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

रोही आडवी आल्याने शिक्षकांच्या गाडीचा भीषण अपघात; बुलढाणा-चिखली मार्गावरील घटना, सुदैवाने चारही शिक्षक बचावले!





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : शासकीय कामकाज आटपून बुलढाणा येथून परत येत असताना चिखली-लव्हाळा रोडवरील अंबाशी फाट्याजवळ एक भीषण अपघात घडला. अचानक रस्त्यावर रोही (निलगाय) आडवी आल्याने शिक्षकांच्या कारचा मोठा अपघात झाला. या घटनेत वाहनाचे अत्यंत भयानक नुकसान झाले असले, तरी सुदैवाने कारमधील चारही शिक्षक सुरक्षितपणे बचावले आहेत.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शिवशंकर डोईफोडे, गजानन उगलमुगले, दिलीप नागरे आणि सतीश खेडेकर हे चार शिक्षक शासकीय कामानिमित्त बुलढाणा येथे गेले होते. दिवसभराचे शासकीय काम आटपून ते आपल्या चारचाकी वाहनाने परत येत असताना, चिखली-लव्हाळा रस्त्यावरील अंबाशी फाट्याजवळ अचानक एक रोही धावत रस्त्यावर आला

रोही अचानक गाडीच्या समोर आल्याने गाडीचा भीषण अपघात झाला. धडक एवढी जोरदार होती की, कारच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला असून वाहनाचे अतोनात नुकसान झाले आहे. अपघाताचे दृश्य पाहून परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

गाडीचे मोठे नुकसान होऊनही सुदैवाने चारही शिक्षकांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही व सर्वजण सुरक्षित बाहेर पडले. 'काळ आला होता, पण वेळ आली नव्हती' असाच अनुभव या घटनेनंतर शिक्षकांनी व्यक्त केला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक मदतकार्य केले. बुलढाणा-चिखली मार्गावर वन्यजीवांचा वावर वाढल्याने वाहनधारकांनी वेगावर नियंत्रण ठेवून काळजीपूर्वक वाहन चालवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

दिवाळीच्या स्वागतासाठी पडघा बाजारपेठ सज्ज; खरेदीसाठी नागरिकांची लगबग!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : दिवाळी सणाचे दिवस जवळ येताच पडघा येथील बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ विविध आकर्षक साहित्यांनी सजली असून, दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. दिवाळी म्हटले की घराची सजावट, रोषणाई, फराळ आणि पारंपरिक पूजासाहित्याला विशेष महत्त्व असते. याच पार्श्वभूमीवर पडघा बाजारपेठेत आकाशकंदील, आकर्षक पणत्या, रांगोळी, तोरणे, विद्युत रोषणाईच्या माळा, सजावटीच्या वस्तू तसेच पूजेसाठी लागणारे साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनाच आकर्षित करणारे विविध प्रकारचे आकाशकंदील आणि रंगीबेरंगी सजावटीचे साहित्य दुकानांमध्ये पाहायला मिळत आहे. पारंपरिक मातीच्या पणत्यांसोबतच आधुनिक सजावटीच्या वस्तूंनाही ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. किराणा दुकाने, मिठाईची दुकाने, कपड्यांची दुकाने आणि फटाक्यांच्या दुकानांमध्येही दिवाळीच्या खरेदीची तयारी दिसून येत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. आधुनिकतेची जोड असली तरी मातीच्या पणत्या, रांगोळी आणि पारंपरिक सजावटीचे महत्त्व आजही कायम आहे. स्थानिक बाजारपेठेतून खरेदी करून छोट्या व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहनही केले जात आहे. एकंदरीत, दिवाळीच्या आगमनाने पडघा बाजारपेठेत सणासुदीची रंगत वाढली असून, खरेदीच्या निमित्ताने बाजारपेठेला नवचैतन्य प्राप्त झाले आहे.



कल्याणशेट्टी महाविद्यालयात दिवाळी सणानिमित्त भित्तिपत्रकाचे प्रकाशन

विद्यार्थ्यांमधील लेखन कौशल्य शिक्षकांनी विकसित करावेत : मल्लिकार्जुन मसुती



भित्तीपत्रकातून विज्ञान, टेरिफ, व दुष्काळावर लेख तसेच कविता सादर

विवेक अंकातून विद्यार्थ्यांनी भीषण दुष्काळावर लेख लिहिले. वाणिज्य विभागाच्या अर्थमंच मधून ट्रम्प यांचा टेरिफ, भारत - न्यूझीलंड व्यापार करार. तर, अग्निपंख मधून विज्ञानाची प्रगती अधोरेखित केल्यामुळे उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

भित्तीपत्रकाची आकर्षक चित्रांनी सजावट

रंगीबेरंगी रांगोळ्याची चित्रे, पणत्या, आकाश कंदील आणि रोषणाईची आकर्षक चित्रे भित्तिपत्रकातून रेखाटली होती. शुभ दीपावली व दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा आशा संदेशानी भित्तिपत्रकाचे शीर्षक सजविण्यात आले होते.

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग प्रगत होत चालले आहे, भ्रमणध्वनी, व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, युट्युब यांचा वापर अधिक होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लेखन कलेकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. आता त्यामध्ये ए.आय. माध्यमाची भर पडली आहे. अशा स्थितीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांची लेखन कला विकसित करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन, उद्योजक मल्लिकार्जुन मसुती यांनी केले.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात, दिवाळी सणानिमित्त विशेष भित्ती पत्रकाचे प्रकाशन उद्योजक मसुती यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत पण वाचक नाहीत अशी ग्रंथालयांची अवस्था झाली आहे. विद्यार्थी मोबाईलच्या आहारी गेले आहेत. ही अवस्था बदलण्यासाठी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रके साकारली पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस आर. लोखंडे यांनी केले. भित्तिपत्रकाचा उद्देश प्रा मनीषा शिंदे यांनी कथन केले, प्राध्यापिका सोनाली कटकधोंड यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ.शितल झिंगाडे-भस्मे , डॉ बाळासाहेब पाटील. प्रा.सौरभ भस्मे, प्रा.ऐश्वर्या तारापुरे, प्रा.सौंदर्या शास्त्री प्रा. जनाबाई चौधरी, प्रा.प्राची गणेचारी, प्रा.विद्या बिराजदार उपस्थित होते.